# श्री मार्तंड देवसंस्थान जेजुरी

(रजि.क्र.ए.–७०८)

श्री क्षेत्र जेजुरी ता. पुरंदर जि. पुणे

## जाहीर निविदा

श्री खंडोबा देवाचा सोमवती उत्सव सोहळा सोमवार दिनांक १७/०७/२०२३ रोजी श्री क्षेत्र जेजुरी येथे साजरा होत असून त्या निमित येणारे भाविक–भक्त, खांदेकरी मानकरी ग्रामस्थांच्या सोई सुविधेसाठी खालीलप्रमाणे जाहीर निविदा मागविण्यात येत आहेत :–

१) ग्रामदेवी जानाई मंदिरा बाहेर साधारण २५ X २० आकाराचा व रेल्वे गेट शेजारी अल्पोपहार या ठिकाणी २० X ३० आकाराच्या मंडपाची व्यवस्था करणे.

२) जेजुरी (छत्रपती शिवाजी महाराज चौक) ते धालेवाडी रस्ता (रेल्वेगेट) ते कऱ्हा नदी तीरापर्यंत पालखी सोहळा मार्गावरील रस्त्याची साफसफाई व दुरुस्ती करणे.

३) धालेवाडी रस्ता (रेल्वेगेट) ते विद्यानगर व्हाया कोरपड मळा पालखी सोहळा मार्गावरील रस्त्याची साफसफाई व दुरुस्ती करणे.

४) पालखी सोहळ्यापुढे वीज व्यवस्था तयार करणे.

५) पालखी सोहळ्यामध्ये सहभागी झालेल्या खांदेकरी, मानकरी व ग्रामस्थ यांना ३०० नग गांधी टोपी व सुती पायमोजे ६०० जोडी पुरविणे.

६) पालखी सोहळ्यापुढे सहभागी झालेल्या भाविक, खांदेकरी, मानकरी व ग्रामस्थ यांना धालेवाडी रस्ता (रेल्वेगेट) शेजारी चहापान, अल्पोपहार व्यवस्था (पुरी–भाजी) साधारण ४००० प्लेट व पिण्याच्या पाण्याची २०० ML बाटलीची व्यवस्था करणे.

७) नरवीर उमाजीराजे नाईक पुतळा ते जुनी घोड्याची पागा फोटोग्राफी व्यवसायासाठी लिव्ह अँड लायसन्स तत्वावर देणेबाबत.

८) श्री खंडोबा मंदिर महाद्वार पायरी मार्गावरील पिंपळाची वेस परिसरात फोटोग्राफी व्यवसायासाठी लिव्ह अँड लायसन्स तत्वावर देणेबाबत.

९) मल्हार भक्तनिवास येथिल गाळा क्र. ३ (सध्या महिला सौंदर्य प्रसाधन) व्यवसायासाठी लिव्ह अँड लायसन्स तत्वावर देणेबाबत.

१०) म्हाळसा– बाणाई अन्नसेवा कक्षाच्या सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावणेसाठी सेफ्टी टँक बसवून मुरुमाची भर करणे. अन्नदान कक्ष किचन मधील फरशी बदलणे. अन्नदान कक्षाच्या (किचन) दक्षिण व पश्चिमेकडील बाजूस पत्र्याला क्रीम्पिंग करणे. अन्नदान कक्ष किचनची दक्षिण–पूर्व बाजूस संरक्षित भिंत बांधणे. (प्रत्यक्ष पाहणी करून निविदा भरावी.)

११) श्री मार्तंड देवसंस्थान जेजुरी या न्यासाच्या वतीने १ वर्षासाठी टेंडर फॉर्म मध्ये दिलेल्या यादी प्रमाणे कार्यालयीन साहित्य पुरविणे.

१२) न्यासामध्ये मौल्यवान वस्तूंचे मोजमाप करणेसाठी (६०० ग्रॅम व २० किग्रॅ वजनासाठी) वजनकाटा पुरविणे.

१३) न्यासातील सेवेकऱ्यांच्या हजेरी नोंदसाठी अत्याधुनिक मशीन पुरविणे.

१४) न्यासाच्या गडकोटातील मिटिंग हॉलमध्ये ऑफिस खुर्ची (१० नग) पुरविणे. (मिटिंग हॉलची पाहणी करून निविदा भरावी.)

टीप :– उपरोक्त कामांबाबत देणगीदार असल्यास कृपया श्री मार्तंड देवसंस्थान कार्यालयाशी संपर्क साधावा.
(मो.क्र. ९७६३०४४०१७ व ९८८१५९७६१८)

### नियम व अटी :–

१) निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार विश्वस्त मंडळाने राखून ठेवलेला आहे.

२) निविदा भरणे कामी फॉर्म फी रु.५००/– जमा करून रीतसर पावती व टेंडरशी सबंधित माहिती देवसंस्थान कार्यालयामधून घ्यावी.

३) इच्छुक टेंडर धारकांनी आपल्या निविदा दि.०८/०७/२०२३ पर्यंत स.९ ते ५ या वेळेत खालील पत्त्यावर जमा कराव्यात.

निविदा जमा करण्याचे ठिकाण
श्री मार्तंड देवसंस्थान,जेजुरी
"मल्हार" भक्तनिवास (दुर्गामाता चौक )
जेजुरी, ता.पुरंदर, जि.पुणे

सही/–
राजेंद्र माणिकराव जगताप
मुख्याधिकारी
श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी

सही/–
पोपट सदाशिव खोमणे
प्रमुख विश्वस्त
श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी

दैनिक संध्या नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
बुधवार, दि. ०५ जुलै २०२३